# बहिःशाल शिक्षण केंद्र वक्ता म्हणून प्रोफेसर विठ्ठल जंबाले यांना विद्यापीठाची मान्यता

देशोन्नती वृत्तसंकलन...

देगलूर ▪ देगलूर महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख डॉ. विठ्ठल जंबाले यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांच्याकडून बहिःशाल शिक्षण केंद्र वक्ता म्हणून मान्यता दिली आहे. प्रस्तुत विद्यापीठाचा बहिःशाल केंद्र वक्ता म्हणून औपचारिक शिक्षणाच्या चौकटीबाहेर ज्ञान विस्तार व शाश्वत विकासाधिष्ठित समाज प्रबोधन व समाज परिवर्तन करण्याच्या हेतूने बहिःशाल शिक्षण केंद्र विद्यापीठात कार्यरत आहे. त्या अंतर्गत विद्यापीठ परिक्षेत्रात विविध ठिकाणी व्याख्याने देणे अपेक्षित आहे. या निवडीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ, अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव शशिकांत चिद्रावार, सहसचिव सूर्यकांत नारलावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागिरे, कोषाध्यक्ष



विलास तोटावार, संचालक राजकुमार महाजन, जनार्दन चिद्रावार, डॉ. कर्मवीर उनग्रतवार, गंगाधर जोशी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. तसेच उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, प्रा.डॉ. अशोक टिपरसे, अधीक्षक गोविंद जोशी, डॉ.चंद्रशेखर बाकेवाड, प्रा. गणपत मैलारे व इतर प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करुन भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

Scanned with OKEN Scanner